# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## सूचना

No.NB/156/२०१९-२०

दिनांक : ३०.०९.२०१९

---

महाविद्यालयातील सकाळ सत्रातील सर्व प्राध्यापकांना, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, बुधवार दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त महाविद्यालयात महात्मा गांधीजींच्या फोटोचे पूजन सकाळी ठीक ९.०० वाजता होईल. तेव्हा सर्वांनी महाविद्यालयाच्या ऑफिस समोर वेळेवर उपस्थित रहावे.

(डॉ. एस. वाय. होनगेकर)
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## सूचना

No.NB/ /2019-20 दिनांक : 01.10.2019

---

सिनिअर व ज्युनिअर महाविद्यालयतील सर्व प्राध्यापकांना कळविण्यात येते की, उद्या बुधवार दिनांक ०२.१०.२०१९ रोजी आपले महाविद्यालय सुरु आहे.

आपआपल्या तासाच्या वेळी वर्गातील मुलांना ५ मिनिटे महात्मा गांधीजींचे विचार कथन करावेत.

( डॉ. एस. वाय. होनगेकर )

प्राचार्य

विवेकानंद कॉलेज,

कोल्हापूर.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार " - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

# राज्यशास्त्र विभाग आयोजित
# महात्मा गांधी जयंती
# कार्यक्रम पत्रिका

- स्वागत व प्रास्ताविक : प्रा.कु. समीक्षा फराकटे
  राज्यशास्त्र विभाग विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
- प्रतिमा पूजन हस्ते : मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर
  विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
- मनोगत : कु. प्रिया बुराण , बी. ए. भाग 2
- आभार : प्रा. डी. ए. पवार

स्थळ : ऑफिस समोरील चौक

दिनांक : बुधवार दि. ०२.१०.२०१९

वेळ : सकाळी ९.०० वाजता

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

# विवेकानंद मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी

कोल्हापूर दि. 02 : राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे सत्य् अहिंसा आणि सर्वधर्म समभाव हे विचार आजसुध्दा प्रासंगिक आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचा निकटचा संबंध आहे. कारण महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यावर आहे. त्यामुळे ते आपल्या जीवनात गांधीजींच्या विचारांचे अनुकरण करत होते. यामुळेच ते गांधीजींच्या स्वतंत्रता आंदोलनात सहभागी झाले होते. गांधीजींच्या विचारांचे अनुकरण करा हीच गांधीजींना खऱ्या अर्थाने आदरांजली आहे. असे प्रतिपादन विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा गांधीजींच्या 150 व्या जयंतीनिमित्त् आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा एस एम रुईकर हे होते.

प्राचार्य डॉ होनगेकर पुढे म्हणाले की, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींचे खरे नाव हे गोविंदराव आहे. परंतु त्यांना त्यांच्या मित्राने गांधीजींच्या विचारासारखे त्यांचे आचार, विचार पाहून त्यांना बापूजी असे संबोधित केले व गोविंदरावांचे बापूजी झाले. आज खऱ्या अर्थाने गांधीच्या विचारांची ओळख समाजातील प्रत्येक घटकाला व विद्यार्थ्यांना करुन देण्याची गरज आहे. कारण गांधीजींनी हातात कोणतेही शस्त्र न घेता देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. यावेळी बी ए भाग 2 ची विद्यार्थिनी कु. प्रिया बुराण हिने गांधीजींच्या विचारांचा पुरस्कार करुन ते विचार प्रत्येकानी आचरणात आणले पाहिजे असे विचार मांडले.

गांधी जयंतीचे औचित्य् साधून आज महाविद्यालयातील प्रत्येक तासाला सर्व प्राध्यापकांनी पाच मिनिटे **गांधीजींचे जीवन व कार्य** या विषयावर प्रबोधन केले व विद्यार्थ्यांना गांधीजींच्या विचारांची ओळख करुन दिली.

प्रस्तावना प्रा. समीक्षा फराकटे यांनी केली तर राज्यशास्त्र् विभागप्रमुख प्रा डी ए पवार यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील ज्युनिअर, सिनिअर महाविद्यालयातील प्राध्यापक , प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

---

**विवेकानंद कॉलेज (स्वायत), कोल्हापूर**

जा.क्र.व्हीसीके/by hand/2019-20 दि.02.10.2019

प्रति,

मा.संपादकसो,

दैनिक ------------कोल्हापूर

विषय : बातमी प्रसिध्दी बाबत.

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती. कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. एस. वाय. होनगेकर)

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर.




One of the students speaking on Mahatma Gandhi

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
KOLHAPUR-416003




VIVEKANAND COLLEGE
ESTD JUNE 1964
KOLHAPUR

Prof. S. A. Farakate speaking on Mahatma Gandhi